राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत जालना जिल्हयातील मंजूर मुलींचे वसतीगृह इमारतीचे सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः गर्ल्स हो २०१५/(१६२/१५)/एस.डी.६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
तारीख: २७ एप्रिल, २०१८

वाचा -

१. **शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांकः मॉडेल स्कुल - २०११/(१४२/११)/एस.डी.६, दि. २३ मे, २०१२.**
२. **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शा.निर्णय क्र. मॉडेल स्कूल, २००१/(१४२/२०११)/ एस.डी.६,दि. १३ मे, २०१४.**
३. **शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांकः गर्ल्स होस्टेल २०१५/(१६२/१५)/एस.डी.६, दि. ५ जानेवारी, २०१८.**
४. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना चे पत्र क्र.रामाशिअ/जिपजा/गर्ल्सहॉ २०१८/४२४ दि. २८ मार्च, २०१८.**
५. **राज्य प्रकल्प समन्वयक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांचे पत्र क्र. रामाशि/बांध/GH.MS/२०१५-१६/नि.वि./(६/१५/२२०१८/४८०) दि. १० एप्रिल, २०१८.**

प्रस्तावना -

केंद्र शासनाने गर्ल्स हॉस्टेल योजने अंतर्गत १४ ते १८ वयोगटाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या १०० मुलींकरिता १ यानुसार राज्यामधील १० जिल्हयातील शैक्षणिकदृष्टया अप्रगत असलेल्या ४३ गटांमध्ये गर्ल्स हॉस्टेल इमारत बांधकामे सन २०१०-११ मध्ये मंजूर केली होती.

२. या योजनेतंर्गत जालना जिल्हयामधील ७ गटातील मुलींचे वसतीगृह बांधकामाकरिता ई-निविदा पध्दतीचा जिल्हास्तरावरुन अवलंब करुन या बांधकामास सन २०१४-१५ मध्ये सुरुवात करण्यात आली. बांधकामाचा मंजूर निधी हा केंद्र शासनातर्फे सन २००९-१० च्या दरसूची आधारे मंजूर झालेला असल्यामुळे मंजूर निधी व आवश्यक निधी यातील फरकामुळे या ४३ गटामध्ये गर्ल्स हॉस्टेल इमारत बांधकामाकरिता आवश्यक असलेल्या अतिरिक्त निधीची मागणी केंद्र शासनाकडे राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत सन २०१६-१७ मध्ये सुधारित अंदाजपत्रकानुसार करण्यात आली होती.

३. या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीमध्ये जालना जिल्हयातील ७ गटामधील मुलींचे वसतीगृह इमारत बांधकामाना लागणारा अतिरिक्त रु. १०.५० कोटी निधी बांधकामे सुरु केलेली असल्यामुळे राज्य शासनाने उपलब्ध करुन द्यावा, असे स्पष्ट निर्देश केंद्र शासनाने दिले होते.त्यानुसार शासनाने शासन निर्णय क्र. गर्ल्स हो २०१५/(१६२/१५)/एस.डी.६ दि. ५ जानेवारी, २०१८ व्दारे जालना जिल्हयातील ७ मुलींचे वसतीगृह इमारत बांधकामासाठी १०.५० कोटी अतिरिक्त निधी मंजूर केला आहे. प्राप्त अतिरिक्त निधीतून उर्वरित बांधकाम पूर्ण करण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्याचे प्रस्तावित होते.

शासन निर्णय-

जालना जिल्हयातील ७ गटातील मुलींचे वसतीगृह बांधकामाकरिता रु. १०.५० कोटी अतिरिक्त निधी शासन निर्णय क्र. गर्ल्स हो २०१५/(१६२/१५)/एस.डी.६ दि. ५ जानेवारी, २०१८ व्दारे मंजूर करण्यात आला आहे. मुलींचे वसतीगृहाची सुरक्षितता व दैनंदिन गरजा आदि करिता संबंधित कंत्राटदार हे सदरील वाढीव काम पूर्वीच्या निविदेतील दराप्रमाणे करुन देण्यात तयार असल्याचे संमती असल्याबाबत संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जालना यांनी कळविले आहे. यांचा विचार करता जालना जिल्हयातील सदर ७ गटातील मुलींचे वसतीगृह इमारतीचे उर्वरित व अतिरिक्त बांधकाम संबंधित कंत्राटदाराकडून सुधारित अंदाजपत्रकानुसार करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०२१२२४३६३१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=065279b98828b1456ad0d62a97fa45eee948af8abe5a27104d4e132c5bd1d93a, cn=Suvarna Siddharth Kharat
Date: 2018.05.02 12:29:00 +05'30'

(डॉ. सुवर्णा खरात)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. विरोधी पक्ष नेता, (विधान सभा/ विधान परिषद), विधानभवन, मुंबई.
४. सर्व मा. विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
५. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई.
६. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
८. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई.
९. सहसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.
१२. संचालक, लेखा व कोषागारे, पुणे.
१३. वरिष्ठ कोषाधिकारी, जिल्हा पुणे.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/वांद्रे
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. वित्त विभाग, (व्यय-५/अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई.
१७. कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प/रोखशाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती, एसडी-६.